महाराष्ट्र शासन -कृषि विभाग
नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प
३०, आर्केड, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई- ४०० ००५.

दूरध्वनी क्र.०२२- २२१६३३५१ email: mahapocra@gmail.com

33१५

जा. क्र. नादेकृसंप्र-०३२५/प्रशिक्षण/प्रक-५७/२०२४-२५/236 दिनांक 13.०३.२०२५

प्रति,

विभागीय कृषी सहसंचालक (अमरावती, छत्रपती संभाजी नगर, नाशिक, लातूर व नागपूर)

**विषय:-** नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प टप्पा-२ अंतर्गत प्रकल्प व्यवस्थापन कक्षाकडून ग्राम कृषि विकास समिती सदस्य यांचेकरिता आयोजित केलेल्या एक दिवसीय वेबिनारबाबत. . .

**संदर्भ:-** १. कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्र. नादेकृ ४६२२/प्रक्र ९४/८ए दि. ३०.६.२०२३
२. कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्र. नादेकृ ४६२२/प्रक्र-९४/८अ, दि.१४.१०.२०२४
३. कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय संकीर्ण २०२०/प्रक्र-८१/३अ, दि.०९.०९.२०२०
४. या कार्यालयाचे पत्र क्र. १०८८, दि. १८.१२.२०२४
५. कृषी आयुक्तालयाकडील पत्र क्र. ८०६७, दि. २७.१२.२०२४
६. या कार्यालयाचे पत्र क्र १९२, दि. १७.१.२०२५

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प टप्पा-२ करिता संदर्भीय शासन निर्णयान्वये मराठवाडा, विदर्भ व उत्तर महाराष्ट्रातील ७२०१ गावांची निवड करण्यात आलेली आहे. प्रस्तुत प्रकल्पातील गावामध्ये ग्रामपंचायत अंतर्गत गठीत करण्यात आलेल्या ग्राम कृषि विकास समितीचे सदस्याकरिता एक दिवसीय प्रकल्प ओळख प्रशिक्षण नियोजित आहे. यापूर्वी प्रकल्पातील ३८०० गावांचे सरपंच यांचेकरिता दोन दिवसीय प्रकल्प ओळख प्रशिक्षण यशदा, पुणे यांनी प्राधिकृत केलेल्या जिल्हा स्तरीय संस्थेमध्ये पूर्ण झालेले आहे.

प्रकल्प जिल्ह्यातील ग्राम कृषी विकास समितीच्या सदस्यांकरिता प्रत्येक कृषी सहाय्यक यांचे सजामधील **ग्रामपंचायत / गाव समूह स्तरावर ग्रामपंचायत कार्यालयाच्या** ठिकाणी **दि. २८ मार्च २०२५, रोजी, शुक्रवारी सकाळी १०.३० वाजता,** एकदिवसीय **"प्रकल्प ओळख"** विषयक प्रशिक्षण आयोजित करण्यात यावे. नियोजित प्रशिक्षणामध्ये **मा. प्रधान सचिव (कृषि) (भाप्रसे)** आणि **प्रकल्प संचालक (भाप्रसे),**नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प हे दूरस्थ पद्धतीने (युट्यूब चॅनेल द्वारे) उपस्थित प्रशिक्षणार्थीसोबत सवांद साधणार आहेत.

याकरिता सदर प्रशिक्षणासाठी प्रत्येक प्रकल्प गावाच्या ग्रामपंचायतीमध्ये कृषि सहाय्यक उपस्थित राहणे आवश्यक आहे. जेथे कृषि सहाय्यकाकडे जास्त गावे आहेत तेथे संबंधित गावांचे कृषि पर्यवेक्षक अथवा मंडळ कृषि अधिकारी यांनी उपस्थित राहायचे आहे. याशिवाय उर्वरित गावामध्ये तालुक्यातील इतर कृषि सहाय्यक, कृषि पर्यवेक्षक व मंडळ कृषि अधिकारी यांनी उपस्थित राहणेबाबत सूचना देण्यात याव्यात. याप्रमाणे नियोजित प्रशिक्षणावेळी प्रत्येक गावामध्ये कृषी विभागाचा एक अधिकारी / कर्मचारी उपस्थित राहतील याची दक्षता घेण्यात यावी. तसेच ज्या ठिकाणी ग्रामपंचायतीमध्ये प्रशासक नेमलेले आहेत त्यांनी आपल्या कार्यालयातून प्रशिक्षणाला उपस्थित राहण्याबाबत निर्देशित करावे.

सदर प्रशिक्षणामध्ये प्रकल्पाची तोंड ओळख, ग्राम कृषी विकास समितीची भूमिका व जबाबदाऱ्या, सूक्ष्म नियोजन प्रक्रिया (MLP) मध्ये नैसर्गिक संसाधानाचे व्यवस्थापन, गावाचा प्रकल्प आराखडा, हवामान अनुकूल तंत्रज्ञान व कृषी व्यवसाय याविषयी प्रकल्प व्यवस्थापन स्तरावरून दूरस्थ पद्धतीने (प्रकल्पाचे युट्यूब चॅनेलद्वारे) मार्गदर्शन करण्यात येणार आहे. सदर प्रशिक्षणाची युट्युब लिंक या कार्यालयाकडून पाठविण्यात येत आहे.

उक्त विषयान्वये आयोजित केलेल्या प्रशिक्षणाकरिता सरपंच, ग्राम कृषी विकास समिती सदस्य यांचेबरोबरच शासकीय निमशासकीय कर्मचारी (ग्रामसेवक, तलाठी, वनपाल, विविध कार्यकारी सहकारी सोसायटीचे सचिव, कृषिसखी (उमेद)) तसेच प्रकल्प गावामध्ये निवडण्यात आलेले स्वयंसेवक यांना उपस्थित राहण्यासाठी आवाहन करण्यात यावे. सदर प्रशिक्षणासाठी ग्रामपंचायतमध्ये प्रोजेक्टर, लॅपटॉप/ संगणक व्यवस्था असावी. तसेच इंटरनेट जोडणी, ऑडीओ स्पीकर (ध्वनी यंत्रणा) योग्य असल्याची खात्री करण्यात यावी तसेच प्रशिक्षणविषयक माहितीकरिता **श्री गजानन ना. टाकळे** (तंत्र अधिकारी, क्षमता बांधणी)-९४२११५४६५० आणि लिंक बाबत तांत्रिक अडचणी करिता **श्री. समीर राजे** (सहायक, माहिती तंत्रज्ञान)-९३२०५५९७१७ आणि यांचेशी संपर्क साधावा.

तसेच प्रशिक्षणादरम्यान ग्रामस्थांनी विचारलेल्या प्रश्नांची / शंकांची नोंद घेण्याची जबाबदारी संबंधित अधिकारी व कर्मचारी यांची राहील. तसेच प्रकल्पाचे युट्यूब live वर Comments section मध्ये शंका विचारण्यास आवाहन करण्यात यावे. याशिवाय प्रत्यक्ष विचारलेल्या शंका/ प्रश्नांची संकलित यादी तालुका कृषी अधिकारी यांचे मार्फत उपविभागीय कृषी अधिकारी / जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी /प्रकल्प संचालक (आत्मा) यांचेकडे सादर करण्यात यावी. जेणे करून सदर प्रश्नांपैकी सामाईक प्रश्नाची उत्तरे FAQ स्वरुपात प्रसिद्ध करणे शक्य होईल.

सदर प्रशिक्षणास उपस्थित अधिकारी व कर्मचारी यांनी उपस्थित समिती सदस्यांचे बरोबर प्रकल्पाबाबत सुसवांद साधावा. तसेच उपस्थित ग्राम कृषी विकास समिती सदस्य व अधिकाऱ्याकरिता चहा आणि अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात यावी.

सदर प्रशिक्षणाकरिता होणाऱ्या खर्चाकरिता प्रती ग्रामपंचायत, कमाल २० व्यक्तीकरिता रु. १००/- प्रती व्यक्ती या कमाल मर्यादेमध्ये (यामध्ये चहा, अल्पोपहार, प्रशिक्षण साहित्य (स्टेशनरी) व आवश्यकतेनुसार प्रोजेक्टर, लॅपटॉप किंवा संगणक व्यवस्था, इंटरनेट जोडणी, ऑडीओ स्पीकर इ. पैकी प्रशिक्षण साहित्य उपलब्ध नसल्यास त्याची सोय करणेकामी) खर्च करण्यात यावा व झालेल्या खर्चाची प्रतीपूर्ती करण्यासाठी निधी मागणी करण्यात यावी.

तसेच नियोजित प्रशिक्षणाचे आयोजन करण्यापूर्वी ग्राम कृषी विकास समितीच्या **(GKVS)** प्रणालीवर **(Portal) माहिती भरणेबाबत** आणि वरील सर्व सूचनांचे पालन करून प्रशिक्षण आयोजित करणेबाबत संबंधिताना सूचित करण्यात यावे.

*सोबत- वरीलप्रमाणे*

Parimal 13/3

**परिमल सिंह**

**प्रकल्प संचालक**

**नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, मुंबई**

**प्रत माहितीस्तव :**

१. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद (प्रकल्पातील सर्व)

**प्रत माहिती व उचित कार्यवाहीस्तव:**

२. उपमुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद (प्रकल्पातील सर्व)

३. जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी (प्रकल्पातील सर्व)

४. प्रकल्प संचालक (आत्मा) (प्रकल्पातील सर्व)

५. उपविभागीय कृषी अधिकारी (प्रकल्पातील सर्व)

६. गट विकास अधिकारी (प्रकल्पातील सर्व)

७. तालुका कृषी अधिकारी (प्रकल्पातील सर्व)

2916

महाराष्ट्र शासन- कृषि विभाग
नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प
३० अर्केड, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई ४०० ००५

ई-मेल - mahapocra@gmail.com
दूरध्वनी क्र. - ०२२-२२१६३३५१

जा. क्र. नादेकृसंप्र२-१२२४/ मृदा विज्ञान/ प्र क्र १३३/ १०८८ दि: १८ /१२/२०२४

प्रति,

१. विभागीय कृषि सहसंचालक, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, लातूर, अमरावती, नाशिक

२. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, प्रकल्प टप्पा-२ मधील सर्व जिल्हे

३. प्रकल्प अधिकारी (आत्मा), प्रकल्प टप्पा-२ मधील सर्व जिल्हे

४. उपविभागीय कृषि अधिकारी, प्रकल्प टप्पा-२ मधील सर्व उपविभाग

विषय- नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाचा टप्पा -२ बाबत ...

संदर्भ- १. कृषि व पदुम विभागाकडील शासन निर्णय क्र नादेकृ ४६२२/प्र.क्र. ९४/८-अे दि. ३०.६.२०२३

२. कृषि व पदुम विभागाकडील शासन निर्णय क्र नादेकृ ४६२२/प्र.क्र. ९४/८-अे दि१४.१०.२०२४

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाकडून प्रकल्प टप्पा-२ करिता महाराष्ट्रातील छत्रपती संभाजीनगर, बीड, जालना, लातूर, धाराशिव, परभणी, नांदेड, हिंगोली, अकोला, अमरावती, बुलढाणा, वाशीम, यवतमाळ, नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली, जळगाव, नाशिक या २१ जिल्ह्यातील ७२०१ गावांच्या निवडीस संदर्भीय शासन निर्णय २ अन्वये मान्यता मिळालेली आहे. सदर प्रकल्पाची अंमलबजावणी सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या अधिकारी/ कर्मचारी (विभागीय कृषि सहसंचालक, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, प्रकल्प संचालक (आत्मा), उपविभागीय कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी, मंडळ कृषि अधिकारी, कृषि पर्यवेक्षक, कृषि सहाय्यक) यांचेमार्फत करावयाची आहे.

प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यात, शेतीविषयक नवीन संशोधनाचा उन्नत शेतीसाठी उपयोग, पाण्याचा कार्यक्षम वापर वाढविण्यासाठी उपाययोजना करणे व त्यायोगे शेतीमधील कर्ब उत्सर्जन कमी करणे, शेतीमध्ये कर्बग्रहण वाढविणे, संवर्धित पुनरुज्जीवित शेती या हवामान शेती पद्धतीचा वापर करून पिकांची उत्पादकता वाढविणे, पौष्टिक तृणधान्य उत्पादनावर भर देणे, हवामान अनुकूल तंत्रज्ञानासाठी विविध संशोधन संस्थांवरोबर भागीदारी करणे या महत्त्वाच्या बाबी प्रकल्पातून राबविण्याच्या आहेत.

त्यानुसार सद्यस्थितीत प्रकल्पाची आखणी व प्रकल्प अंमलबजावणी आराखडा तयार करावयाच्या दृष्टीने पुढीलप्रमाणे कामकाजास जिल्हास्तरावरुन सुरुवात करावयाची आहे.

१. ग्राम कृषि विकास समिती अध्यक्ष व सदस्यांची माहिती प्रकल्पाच्या वेब-पोर्टलवर भरण्याबाबत कृषि सहाय्यकांना सूचित करावे.

२. प्रकल्पासाठी निवडलेल्या गावांचे सरपंच आणि ग्राम कृषी विकास समितीच्या सदस्यांचे प्रशिक्षण शासनाच्या यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा) मार्फत आयोजित करण्यात येणार आहे. त्याकरिता प्रशिक्षण कार्यक्रम निश्चित झाल्यावर संबंधित प्रशिक्षणास उपस्थित राहतील, याची दक्षता घेणेबाबत कृषि सहाय्यक यांना सूचित करावे.

३. प्रकल्प गावांचा प्रकल्प आराखडा (गावस्तरीय हवामान अनुकूलन आराखडा) तयार करण्यासाठी कृषी सहाय्यकाचे प्रादेशिक कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था (रामेति) मार्फत आयोजित करण्यात येणार आहे. त्याकरिता प्रशिक्षण कार्यक्रम निश्चित झाल्यावर संबंधितांस प्रशिक्षणास उपस्थित राहणेबाबत सूचित करावे.

४. प्रकल्प गावात सुक्ष्मनियोजन प्रक्रिया सुरू करावयाची आहे व त्यानुसार गावस्तरीय हवामान अनुकूलन आराखडा तयार करावयाचा आहे. त्याकरिता प्रकल्पाने विकसित केलेले MLP App मध्ये मुलभूत माहिती भरणेचे कामकाज करणेविषयी कृषि सहाय्यकांना सूचित करावे. तसेच सुक्ष्मनियोजन प्रक्रिया वेळापत्रक तयार करून प्रक्रिया पार पाडणेबाबत उपविभागीय कृषि अधिकारी यांना सूचित करावे.

५. प्रकल्प अंमलबजावणी आराखडा तसेच प्रकल्पाच्या अन्य पुस्तिका तयार करण्यासाठी वेळोवेळी लागणारी माहिती उपलब्ध करून देण्यात यावी.

६. प्रकल्प टप्पा-२ कार्यान्वित झाला असलेबाबत्ची माहिती जिल्ह्याचे पालकमंत्री, खासदार, आमदार व लोकप्रतिनिधी यांना देण्यात यावी.

तरी प्रकल्प टप्पा-२ च्या अनुषंगाने प्रकल्प व्यवस्थापन कक्षाकडून उक्त नमूद तसेच वेळोवेळी देण्यात येणा-या सुचनांचे पालन करणेविषयी आपले स्तरावरुन क्षेत्रीय कार्यालयांस कळविण्यात यावे.

Parimal 18/12

(परिमल सिंह)
प्रकल्प संचालक

प्रत- माहितीसाठी

१. मा. सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई

२. आयुक्त, कृषि, कृषि आयुक्तालय, म. रा., पुणे

महाराष्ट्र शासन
संचालक मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन,
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-४११००१.
दुरध्वनी क्र.०२०-२६०५५३२२/२६०५५३२३.Email-jdasoil2020@gmail.com

जा.क्र.मृदसं/मृद -१/नादेकृसंप्र /२०६७/२०२४ दि. २०/१२/२०२४.

प्रति.
१)विभागीय कृषि सहसंचालक ,नागपूर,छ. सांभाजीनगर,लातूर,अमरावती,नाशिक.
२) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,प्रकल्प टप्पा-२ मधील सर्व जिल्हे.

विषय :- नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाचा टप्पा-२ बाबत.....

संदर्भ :- मा. प्रकल्प संचालक यांचे जा. क्र. नादेकृसंप्र २-१२२४/मृदा विज्ञान/प्र. क्र.१३३/१०७४ ,दिनांक १३/१२/२०२४ रोजीचे पत्र.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाकडून टप्पा-२ करिता महाराष्ट्रातील २१ जिल्ह्यातील ७२०१ गावांच्या निवडीस दिनांक १४.१०.२०२४ च्या शासन निर्णयान्वये मान्यता मिळालेली आहे.

यामध्ये प्रकल्प टप्पा -२ विषयीची जनजागृती, क्षेत्रीय स्तरावरील अधिकारी/कर्मचारी यांचे प्रशिक्षण, ग्राम कृषि विकास समितीचे अध्यक्ष तथा सरपंच व समिती सदस्य यांचे प्रशिक्षण. लोकसहभागी पद्धतीने सूक्ष्मनियोजन,पाण्याचा ताळेबंध तयार करणे, प्रकल्प अंमलबजावणी आराखडा व प्रकल्पाच्या अन्य पुस्तिका तयार करण्याकरिता माहिती उपलब्ध करून देणे, इ. कामकाज अंतर्भूत आहे. संदर्भिय पत्राद्वारे प्रकल्प व्यवस्थापन कक्षाकडून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सुचनांनुसार कार्यवाही करण्याबाबत सूचित करण्यात आलेले आहे.

तरी प्रकल्प टप्पा -२ च्या अनुषंगाने प्रकल्प व्यवस्थापन कक्षाकडून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे ही विनंती.

मनोहर मुंढे
कृषि सहसंचालक (मृ.स. व पाक्षेव्य )
कृषी आयुक्तालय , पुणे

प्रत:- मा. प्रकल्प संचालक,नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, मुंबई-४१०००५ यांना माहितीस्तव.

महाराष्ट्र शासन- कृषि विभाग

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प

३० अर्केड, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई ४०० ००५

दूरध्वनी क्र. - ०२२-२२१६३३५१ ई-मेल - mahapocra@gmail.com


जा.क्र. नादेकृसंप्र-०१२५/ प्र.क्र.५१/ मृदाविज्ञान/१९२/२०२५ दिनांक: २५/०२/२०२५

प्रति,

१. विभागीय कृषी सह संचालक, छ.संभाजीनगर, लातूर, अमरावती, नागपूर, नाशिक.

२. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (प्रकल्प टप्पा-२ मधील सर्व जिल्हे)

३. प्रकल्प संचालक (आत्मा) (प्रकल्प टप्पा-२ मधील सर्व जिल्हे)

**विषय - मार्गदर्शक सूचना - नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प टप्पा-२ अंतर्गत लोकसहभागीय सूक्ष्मनियोजन करून गावस्तरीय हवामान अनुकूलन आराखडा तयार करणे ...**

संदर्भ - १. कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्र. नादेकृ ४६२२/प्रक्र-९४/८अ, दि.१४.१०.२०२४

२. या कार्यालयाकडील पत्र क्र नादेकृसंप्र २- १२२४/ मृदाविद्या/ प्र क्र १३३/ १०८८ दि. १८.१२.२०२४

३. कृषि आयुक्तालयाकडील पत्र क्र. मृदसं/ मृद-१/ नादेकृसंप्र/ २८०६७/ २०२४ दि. २७.१२.२०२४

४. मा. प्रकल्प संचालक यांच्या अध्यक्षतेखालील online बैठक दि. १०.१.२०२५ चे इतिवृत्त

५. या कार्यालयाकडील पत्र क्र. नादेकृसंप्र-०१२५/ प्र क्र ०१/ कृ अ/ ६०/ २०२५ दि. १७.१.२०२५

६. या कार्यालयाकडील पत्र क्र. नादेकृसंप्र-०१२५/ प्र क्र / मृ वि/ १३७/ २०२५ पेसा दि. ७.२.२०२५

महाराष्ट्र शासन आणि जागतिक बँकेच्या मान्यतेने राज्यातील मराठवाडा, विदर्भातील सर्व १९ जिल्हे आणि उत्तर महाराष्ट्रातील नाशिक व जळगाव अशा २१ जिल्ह्यांत नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प टप्पा-२ राबविण्यात येत असून सदर प्रकल्पांतर्गत गावांची निवड संदर्भीय शासन निर्णयाद्वारे करण्यात आलेली आहे. प्रकल्पाच्या अंमलबजावणीकरिता सदर गावांचे लोकसहभागीय पद्धतीने सूक्ष्मनियोजन करून गावस्तरीय हवामान अनुकूलन आराखडा तयार करणे आवश्यक आहे. याकरिता करावयाच्या लोकसहभागीय सूक्ष्मनियोजन प्रक्रिया विषयक मार्गदर्शक सूचना सहपत्रित करण्यात येत आहेत. त्याचे अवलोकन व्हावे व त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी. लोकसहभागीय सूक्ष्मनियोजन प्रक्रिया गावात सूलभतेने राबविण्यासाठी पुढील सूचनांचे पालन करावे.

१. शासन निर्णयामध्ये नमूद महसूल गावांमध्ये आणि प्रकल्पातील पेसा क्षेत्रातील घोषित गावांत ४ स्वयंसेवकांची संदर्भीय पत्र ५ अन्वये देण्यात आलेल्या सुचनांनुसार त्वरीत निवड करण्यात यावी. यामध्ये कमीतकमी ५० टक्के महिला स्वयंसेवक असाव्यात.

२. सूक्ष्मनियोजनासाठी प्रत्येक उपविभागास एक याप्रमाणे उपविभागिय कृषि अधिकारी कार्यालयात सूक्ष्मनियोजन समन्वयक **याची चार** महिन्यांकरिता मानधन तत्त्वावर नेमणूक करण्यात यावी. सदर कार्यवाही जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांचेस्तरावरून करण्यात यावी.

३. लोकसहभागीय पद्धतीने सूक्ष्मनियोजन प्रक्रिया विषयक प्रशिक्षण रामेति, छत्रपती संभाजीनगर, अमरावती. नाशिक, नागपूर येथे नियोजित केले असून, त्याकरिता नेमून दिलेल्या वेळापत्रकानुसार अधिकारी व कर्मचारी यांना प्रशिक्षण संस्थेमध्ये उपस्थित राहण्यास्तव कार्यमुक्त करावे.

४. दिनांक १७ मार्च २०२५ पासून प्रत्येक उपविभागामध्ये प्रथम एक प्रकल्प गाव निवडून तेथे सूक्ष्म नियोजन समन्वयकांच्या मार्गदर्शनाखाली प्रत्यक्ष सूक्ष्मनियोजन प्रक्रिया राबविण्यात यावी, आणि तेथे संबधित उपविभाग/ तालुक्यातील प्रकल्पाशी संबधित एकूण कृषी सहाय्यक, कृषी पर्यवेक्षक आणि मंडळ कृषी अधिकारी यांचेपैकी ५० % अधिकारी/कर्मचारी सदर प्रक्रियेचे निरीक्षण आणि सहभागीय तंत्रांचा सराव करण्याच्या उद्देशाने उपस्थित राहतील याची दक्षता घ्यावी. अशाच प्रकारे त्यापुढच्या आठवड्यात आणखी एका गावाची फेरी पूर्ण करावी, जेणेकरून प्रकल्पाशी संबधित सर्व कृषी सहाय्यकांना व अधिकाऱ्यांना सरावाची संधी मिळेल.

५. वरील दोन्ही फेऱ्यानंतर प्रत्येक कृषी सहाय्यकाने त्यांचे प्रत्येक प्रकल्प गावामध्ये सोबतच्या मार्गदर्शक सूचनांचा अवलंब करून सूक्ष्म नियोजन पूर्ण करावे आणि हवामान अनुकूलन अराखाडे तयार करावेत याबाबत आपल्या स्तरावरून सनियंत्रण करण्यात यावे.

६. तालुका कृषी अधिकारी यांनी गावनिहाय निवड केलेल्या स्वयंसेवकांचे मंडळ/तालुकास्तरावर एक दिवसीय कार्यशाळा घ्यावी आणि त्यांचा सूक्ष्म नियोजन प्रक्रियेमध्ये सक्रीय सहभाग राहील असे नियोजन करावे.

७. प्रशासक कार्यरत असलेल्या गावांचे देखील सूक्ष्म नियोजन करून आराखडे तयार करावेत.

८. पेसा गावांमध्ये दि. ७.२.२०२५ च्या पत्रान्वये देण्यात देण्यात आलेल्या सूचनानूसार सूक्ष्म नियोजन प्रक्रिया राबविण्यात यावी.

सूक्ष्म नियोजन करून संपूर्ण प्रकल्प गावांचे आराखडे दि. ३० जून २०२५ पर्यंत मंजूर करून घेण्यात यावेत.

Parimal 25/2

**प्रकल्प संचालक**
**नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, मुंबई**

**प्रत, माहितीसाठी**

१. आयुक्त, कृषि, कृषि आयुक्तालय, म. रा., पुणे
२. कृषी संचालक (सर्व), कृषी आयुक्तालय , पुणे

**प्रत- कार्यवाहीस्तव अग्रेषित**

१. उपविभागीय कृषि अधिकारी, (प्रकल्पातील सर्व ५५ उपविभाग)
२. तालुका कृषी अधिकारी (प्रकल्प जिल्ह्यातील २२४ तालुके)